असा. क्र. ११६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८



# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, डिसेंबर १५, २००६/अग्रहायण २४, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**


# भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ डिसेंबर २००६

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर. १०९४/२१५६/(२०५)-दोन.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुका अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि अस्तित्वात असलेले संबंधित सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या विधि व न्याय विभागाच्या सॉलिसिटर (मुफसिल विवाद)-नि-उप सचिव, गट-अ या पदाच्या सेवाभर्तीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, जसे :—

१. या नियमांना विधि व न्याय विभागातील सॉलिसिटर (मुफसिल विवाद)-नि-उप सचिव, गट-अ(सेवाप्रवेश) नियम, २००६ असे संबोधण्यात यावे.



[किंमत : रुपये ७.००]

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर—

(अ) " आयोग " म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग,

(ब) " पदवी " म्हणजे संविधानिक विद्यापीठाची पदवी,

(क) " विभाग " म्हणजे शासनाचा विधि व न्याय विभाग,

(ड) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन.

३. विधि व न्याय विभागातील सॉलिसिटर (मुफसिल विवाद)-नि-उप सचिव, गट-अ या पदावरील नेमणुका खालीलपैकी कोणत्याही मार्गाने करता येतील—

(अ) विधि व न्याय विभागातील अवर सचिव (विधि) पदधारक व त्या पदावर ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून सेवाज्येष्ठतेनुसार व निव्वळ निवड निकषावर पदोन्नतीने किंवा ;

(ब) नामनिर्देशनाने अशा उमेदवारातून जे—

(१) ४० वर्षांपेक्षा जास्त वयाचे नाहीत, आणि, तथापि शासन सेवेत असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथीलक्षम राहील.

(२) विधि व न्याय विभागातील विधि शाखेमधील शासनाचे अवर सचिव पदापेक्षा कमी नाही अशा पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही अशा कालावधीकरिता पद धारण करीत आहे, किंवा,

(३) राज्य न्यायिक सेवेतील, दिवाणी न्यायाधिश (उच्च स्तर) पदावर पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीकरिता पद धारण करीत असलेले ; किंवा,

(४) उच्च न्यायालय, मुंबई किंवा त्याचे अधिपत्याखालील इतर न्यायालयात वकील म्हणून किंवा सॉलिसिटर फर्ममध्ये सात वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीकरिता व्यवसाय केलेले ; आणि,

(५) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असलेले ; किंवा,

(क) अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश या पदावरील सुयोग्य व्यक्तीच्या बदलीने.

४. पदोन्नती व नामनिर्देशन या मार्गांनी करावयाच्या नेमणुका ५० : ५० या प्रमाणात करता येतील.

५. सदर पदावर नियुक्त झालेली व्यक्ती २ वर्षांच्या परिविक्षा कालावधीवर राहील. परिविक्षा कालावधी जास्तीत जास्त एक वर्षाने वाढविता येईल. पदावर नियुक्त व्यक्तिने त्या पदासाठी विहित विभागीय परिक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमांनुसार उत्तीर्ण करून परिविक्षा कालावधी विहित मुदतीत यशस्वीरीत्या पूर्ण करणे आवश्यक राहील. जर त्याने परिविक्षा कालावधी विहित किंवा वाढविलेल्या मुदतीत यशस्वीरीत्या पूर्ण केला नाही किंवा विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली नाही, किंवा ही परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली नाही किंवा त्या पदासाठी अपात्र आढळल्यास त्याची सेवा पूर्वसूचनेशिवाय समाप्त करण्यात येईल.

६. पदावर नियुक्ती झालेल्या व्यक्तीला, महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाद्वारे वेळोवेळी विहित संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

७. सदर पदावर नियुक्ती केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यातील विधि व न्याय विभागाच्या कोणत्याही कार्यालयात बदली होण्यास पात्र राहील.

८. या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीला, त्याने विहित नियमानुसार हिंदी व मराठी भाषेची परीक्षा आधी उत्तीर्ण केली नसल्यास अथवा ही परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. पि. भंगाळे,**
प्रधान सचिव व विधि परामर्शी.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 6th December 2006

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. RTR. 1094/2156(205)-II.—In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of the Constitution of India and in supersession of all the existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules, regulating recruitment to the post of Solicitor (Mofissil Litigation)-*cum*-Deputy Secretary, Group A, in the Law and Judiciary Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These Rule may be called the Solicitor(Mofussil Litigation)-*cum*-Deputy Secratary, Group A, in the Law and Judiciary Department Recruitment Rules, 2006.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) " Commission " means the Maharashtra Public Service Commission ;

(*b*) " Degree " means a degree of a Statutory University ;

(*c*) " Department " means the Law and Judiciary Department of the Government ;

(*d*) " Government " means the Government of Maharashtra.

3. Appointment to the post of Solicitor (Mofussil Litigation)-*cum*-Deputy Secretary, Group A, in the Law and Judiciary Department shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of strict selection with due regard to seniority, from amongst the persons holding the post of Under Secretary (Legal) in the Department having not less than three years regular service in that post ; or

(*b*) by nomination from amongst the candidates who,—

(*i*) are not more than forty years of age :

Provided that, the age limit may be relaxed upto five years in case of candidates already serving in the Government ; and

(*ii*) are holding the post of not lower in rank than that of Under Secretary to Government on the Legal Side of the Law and Judiciary Department for a period of not less than three year ; or



(*iii*) are holding the post of Civil Judge (Senior Division) in the State Judicial Service, for a period of not less than five years ; or

(*iv*) are practicing as an Advocate in the High Court or Courts subordinate thereto, or working as an Advocate in a Solicitor Firm, for a period of not less than seven years ; and

(*v*) have adequate knowledge of Marathi language ; or

(*c*) by transfer of a suitble person from amongst the persons holding the post of Additional District Judge.

4. Appointment to the post by promotion and nomination shall be made in the ratio of 50 : 50.

5. A person appointed to the post shall be on probation for a period of two years.

Probation period may be extended maximum upto one year only. Person appointed to the post shall be required to pass the departmental examination as may be prescribed for the post, and clear the probation successfully within the prescribed probation period. If such person fails to complete the probation successfully within prescribed or extended period ; or fails to pass unless exempted from passing such examination ; or is not found suitable for the post, such person shall be liable for termination from the service without prior notice.

6. A person appointed to the post shall possess a " Certificate in Computer Operation " prescribed by the Directorate of Information and Technology, Government of Maharashtra, from time to time.

7. A person appointed to the post shall be liable to be transferred in any office of the Department in the State of Maharashtra.

8. A person appointed to the post shall be required to pass the examination in Hindi and Marathi, according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing, those examinations.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. P. BHANGALE,
Principal Secretary and
Remembrancer of Legal Affairs.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई